प्रकरण पहिले

# एकोणिसाव्या शतकातील समाज जीवन आणि नियतकालिके

## प्रकरण पहिले

## एकोणिसाव्या शतकातील समाज जीवन आणि नियतकालिके

### एकोणिसाव्या शतकातील धार्मिक व सामाजिक जीवन :

मध्ययुगीन हिंदुस्थानामध्ये कृषिसंस्कृतीचा प्रभाव असल्यामुळे दैववाद मोठ्या प्रमाणावर रुजला होता. परंपरेने चालत आलेल्या पारलौकिकतेच्या प्रभावामुळे समाजमनात परमार्थप्रवणता दृढ झाली होती. त्यामुळे भौतिक जीवनाचे संरक्षण आणि संवर्धन याचा फारसा विचार झालेला नव्हता. तथापि ऐहिकतेचा अभावही जाणवत होता. धर्माचा

महत्वाचा उद्देश म्हणजे मानव व ईश्वर यांचे नाते जडणे आणि त्याचे प्रतिबिंब मानवा-मानवांच्या व्यवहारात उमटवणे. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी-परंपरा, धर्मकल्पना, अर्थजीवन, ग्रामव्यवस्था व सामाजिक व्यवहाराचे संकेत यांवर दीर्घकालपर्यन्त मध्ययुगीन संस्कृतीचेच वर्चस्व राहिले. समाजात स्वधर्मनिष्ठा असली तरी समाजनिष्ठा निर्माण झाली नव्हती. कुळाची प्रतिष्ठा, जातीची शुध्दता व वतनाचा अभिमान यामोवतीच सारे जीवनचक्र फिरत होते. ख-या धार्मिकतेपेक्षा धर्मभोळेपणा, शास्त्रापेक्षा रुढीचे स्तोम, कर्मकांड, व्रतवैकल्ये, मंत्र-तंत्र, शकुनापशकुन यांवरच भर दिला जात होता. परमार्थप्रवणतेमुळे भौतिक विकासाचा विचार समाज-मनात निर्माण झालेला नव्हता. इंग्रजांच्या आगमनामुळे त्यांच्या विज्ञान निष्ठ जीवनदृष्टीमुळे इहवादी, भौतिक जीवन विकासाची जाणीव आमच्यात निर्माण झाली. सांस्कृतिक विकासाचे मार्ग मूठभर लोकांच्याच हाती असल्यामुळे सामान्य जनता अज्ञानाच्या अंधारात गुरफटली होती. उत्पादन साधने व दळणवळणाचे मार्ग फार मर्यादित होते. शेती, सैनिकी पेशा, वैदिकी व मामुली गरजा भागविणारी कारागिरी या-पलीकडे अर्थार्जनाचे मार्ग उपलब्ध नव्हते. परंपरागत कृषिसंस्कृतीचा प्रभाव आणि आत्यंतिक दैववाद त्यामुळे भौतिक जीवनाचे संरक्षण आणि संवर्धन याचा फारसा विचार कुणी केलाच नव्हता.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रथम पादांत फ्रान्समध्ये राज्य-क्रांती झाली होती. तिच्यातून समता, स्वातंत्र्य, बंधुता ही लोक-शाहीची तीन तत्वे आली होती. जीवनाच्या आर्थिक, धार्मिक, सामाजिक बाबतीत स्वतंत्र विचार सुरू झाले होते. या विचारांचा पगडा असलेल्या इंग्रज अधिका-यांनी व्यापार, राजकारण, आणि धर्मप्रसार या त्रिसूत्री धोरणाद्वारा ब्रिटिश राजवटीचा हिंदुस्थानमध्ये भरभक्कम पाया

रोवला. ब्रिटिशांच्या आगमनामुळेच हिंदुस्थानातील भौतिक प्रवृत्ती आणि मानसिक परिवर्तन घडून येण्याची शक्यता निर्माण झाली. व्यापारी व राजकीय हेतूंच्या सिध्दीसाठी पाश्चात्य संस्कृतीचा हेतुत: प्रचार करणे हेही त्यांचे महत्वाचे उद्दिष्ट होते. त्यांनी राजकीय आक्रमण जितक्या गुप्तपणे केले, तितकेच त्यांच्या ख्रिस्ती धर्माने सेवाधर्माच्या आश्रयाने, हिंदुस्थानात आक्रमण केले.

ख्रिस्ती धर्मप्रसार :

महाराष्ट्रात तर प्रत्यक्ष पेशवाई नष्ट होण्याच्या आधीपासूनच ठिकठिकाणी विखुरलेल्या ख्रिस्ती मिशन-यांनी जनमनावरील धर्मविषयक पकड ढिली करण्याचा प्रयत्न सतत चालविला होता. हिंदूंच्या अंगवळणी पडलेला धर्म म्हणजे दुसरे - तिसरे काही नसून ब्राह्मणांनी धूर्तपणाने आपले वर्चस्व त्रैवर्णिकावर अबाधित राखण्यासाठी चालवून दिलेले एक आचारांचे रहाटगाडगेच आहे असा प्रचार त्यांनी चालविला होता. इंग्रजशाहीत त्यांनी ही प्रचाराची मोहिम निकराने चालविली. हिंदूंच्या सा-या धर्मकल्पना म्हणजे मूर्ख व भोळसट अशा समजूतीचे एक कडबोळे असल्याचे ते उघडपणे बोलू लागले. हिंदूचे देव, त्यांचे अवतार, त्यांची रूपे व कार्ये, त्यांची मानवी चरित्रे व दैवी सामर्थ्य इत्यादींची थट्टा उडवून असल्या मूर्खपणाने हिंदूधर्म ओतप्रत भरला असल्याचे आता मिशनरी बोलू लागले. नानाप्रकारचे श्रुति-स्मृति पुराणोक्त आचार-व्यवहार, पूजा-अर्चा, नवससायास यांची त्यांनी भरपूर टिंगल करून घेतली. हिंदूंचा पुनर्जन्मावरील विश्वास व पाप-पुण्यासंबंधीच्या त्यांच्या कल्पना यावर देखील त्यांनी कुत्सित हल्ले चढविले. ही वैचारिक चढाई करण्यात ख्रिस्ती मिशन-याना ज्या पत्रक-पुस्तिकांचा अस्त्रासारखा उपयोग झाला

तीं बंगालमध्ये सीरामपूर मिशनऱ्यांमधील छापखान्यात छापली जात असत.

इंग्रजी अमदानीमध्ये हिंदुस्थानात ज्ञानाच्या विविध क्षेत्रात जे कार्य मोठ्या जोमाने सुरू झाले, त्याची मुहूर्तमेढ १७८४ सालीच सर विल्यम जोन्स याने कलकत्यामध्ये रोवली होती. त्याने ` एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल ` या संस्थेची स्थापना केली. हिंदुस्थानचा इतिहास, प्राचीन अवशेष, कला, शास्त्र आणि वाङ्मय इत्यादींचा अभ्यास करणे हे या संस्थेचे सर्वांत प्रमुख उद्दिष्ट होते. शास्त्रीय पध्दतीने आपल्या इतिहासाचा आणि संस्कृतमधील ज्ञानभांडाराचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली ही पहिलीच संस्था होती. या संस्थेचे कार्य अनेक व्यक्तींना मार्गदर्शक ठरले. या एशियाटिक संस्थेच्या आरंभीच्या सभासदांपैकी विल्यम चेंबर्स, ग्लॅडविन्, हॅमिल्टन् आणि चार्ल्स विल्किन्स यांनी संस्कृत, पारशी, बंगाली भाषांचा अभ्यास करून एतद्देशीय ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर केले. विल्किन्सनने तर फार बुध्दिचातुर्याने आणि दीर्घ परिश्रम करून संस्कृत, पर्शियन व बंगाली टाईप पाडून छपाईची सोय करून दिली, व हिंदूंचे धर्मशास्त्रावरील ग्रंथही भाषांतरित केले. आणि हिंदूंच्या व्यापक ज्ञानोपासनेचा परिचय पाश्चात्यांना करून दिला. बंगालमधील या इंग्रजांच्या, हिंदुस्थानातील प्राचीन इतिहासाचा, शास्त्रांचा व साहित्याचा परिश्रमपूर्वक केलेल्या व्यासंगामुळेच एकोणिसाव्या शतकात हिंदुस्थानीयांना ज्ञानसंपादन व ऐहिक संवर्धनाची प्रेरणा मिळाली हे निर्विवाद आहे.

ख्रिस्ती मिशनऱ्यांनी आपल्या धर्मपाशात अडकविण्यासाठी हिंदुस्थानीय लोकांची धर्मश्रध्दा डळमळीत करण्याचा जोरदार प्रयत्न केला. डॉ. विल्सन सारख्या विख्यात मिशनऱ्याने ` हिंदुधर्मप्रसिध्दीकरण `

हा ग्रंथ लिहून हिंदुधर्मावर चौफेर हल्ले चढविले. या आकस्मिक हल्यामुळे काही प्रतिपक्षी बावचळून गेले, तर कांहीना ही डिवचणी उत्तर देण्यास कारणीभूत ठरली. आपल्यापाशी जी काय उपलब्ध साधनसामुग्री असेल ती घेऊन यावेळी प्रतिपक्षाला धडक दिली नाही, तर आपला धर्म हा-हा म्हणता नेस्तनाबूत होईल या विचाराने जे अस्वस्थ झाले त्यांनी आपल्या लेखण्या सरसावल्या व प्रसंग पडेल तेथे वाणीचाही वापर केला. हिंदुधर्मावरील हल्ला मुख्यत्वेकरून मिशनऱ्यांकडून झालेला असल्यामुळे साहजिकच तदनुषंगाने ख्रिस्तीधर्माविषयीही अनुकूल प्रतिकूल मतप्रकटन भरपूर झाले. पाद्री मंडळींनी ख्रिस्ती धर्माचा फारच गाजावाजा चालविल्यामुळे हिंदुधर्मासंबंधी लिहावे अशी परिस्थिती निर्माण झाली. स्वाभाविकच हिंदुधर्माचा बचाव करणाऱ्यांना, आपल्या धर्मावर जे खरे खोटे आक्षेप घेण्यात येत होते, त्यांचे निरसन तर करावे लागेच; पण याच्या जोडीला धर्मांतहि कसे दोष आहेत याचेही विवरण करावे लागत असे. स्वधर्मावर होणाऱ्या हल्याला परतवून लावण्यासाठी हिंदुधर्मियांच्या लेखण्यांना ऊत आला होता. आणि यातूनच धर्माची खरी मूल्ये काय असावीत, बदलत्या जगाप्रमाणे धर्मांनेहि आपली कालबाह्य झालेली मूल्ये झिडकारून नवीन मूल्यांची कास धरावी अशा स्वरूपाचे वातावरण हिंदुस्थानामध्ये तयार होऊ लागले.

एकोणिसाव्या शतकातील सामाजिक जाणिवांचा विचार करता स्पर्शबंदी, रोटीबंदी, बालविवाह, बालाजरठविवाह, विधवांचे केशवपन अशा गंभीर प्रश्नांच्या नाना प्रकारामुळे साऱ्या देशाला एखाद्या मोठ्या मोठ्या बंदीगृहाची अवकळा आली होती. समाजाच्या एकसंधतेला तडा जाऊन उच्चनीचतेच्या निर्घृण जातिवृत्तीने सारेच पछाडले होते. दलित म्हणून काही वर्ग कायमचेच दुर्दैवी ठरले. त्यांच्या नशिबी आजन्म, अपमानित, पराभूत,

अन्याय जगणे आले. सारी प्रजाच आर्थिकदृष्ट्या जर्जर होऊन गेली. मोठाली कुटुंबे हे भूषण वाटेनासे झाले. बालविवाहामुळे कोणत्या गैरसोयी निर्माण होतात, त्यातील धोके कोणते, त्याचा समाज स्वास्थ्यावर व कुटुंबाच्या स्थितीवर विपरीत परिणाम कसा होतो, दुष्काळ-महामारीमुळे बालमृत्यूचे वाढलेले भयावह व त्यामुळे बालपत्नीवर ओढवणारे वैधव्य इत्यादी गोष्टींचा गंभीरपणाने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली. तरीही बालविवाहाची चाल मात्र तशीच होती. तिच्यामुळे बिचाऱ्या बालिकांवर ओढवू पाहणारे संभाव्य वैधव्य आणि त्यांच्या जन्माची होणारी दुर्दशा, रूढीप्रमाणे त्यांच्यावर लावण्यात आलेले केशवपनासारखे अमानुष प्रायश्चित्त आणि संन्यस्त जीवनाची सक्ती यासारख्या गंभीर गोष्टी अंत:करणाचा वेध घेणाऱ्या आहेत. द्रव्यलोभ लाचारी, दारिद्र्य, दडपण अथवा अज्ञान यांना बळी पडून अल्पवयी मुलींची लग्ने म्हाताऱ्या नवरदेवांशी लावून टाकण्याच्या प्रथेमुळेच बालविधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न निर्माण झाला. आपल्या देशात तसे पहायला गेल्यास पुरुषवर्गाच्या बाबतीत पुनर्विवाहाचा प्रश्न कधी उद्भवलाच नव्हता. अनेक स्त्रिया करण्याचा पुरुषाचा हक्क मात्र अबाधित होता. सतीसारखी अमानुष प्रथा तर साऱ्या मानवजातीला कलंकित करणारी होती. या साऱ्या गोष्टी निंद्य असल्या आणि समाजातील सहृदयवर्गाने त्यांचा सदैव तिरस्कार केला असला तरी देखील स्वयंप्रेरणेने ह्या पध्दती बंद करण्याच्या बाबतीत कुणी फारसे लक्ष घातले नव्हते.

## राजकीय स्थित्यंतरासोबत मानसिक परिवर्तन

पाश्चात्य संस्कृति मुख्यत: नागर, विज्ञाननिष्ठ व उद्योगप्रवण होती तर त्या उलट हिंदुस्थानची संस्कृति ही पारमार्थिक, कृषिप्रधान

व ग्रामीण होती. औद्योगिक संस्कृति ही प्रयत्नशील, गतिमान व व्यापक असते तर कृषिप्रधान संस्कृति स्थितिशील, दैववादी व संकुचित असते. या औद्योगिक संस्कृतीचा कृषिप्रधान हिंदुस्थानी संस्कृतीशी संघर्ष होताच, हिंदुस्थानच्या जीवनात स्थित्यंतर घडून आले. नवी शासनपध्दती, कायदा - सुव्यवस्था, शिक्षणसंस्था, मुद्रणालये, ग्रंथ-प्रसार, दळणवळणाची साधने, नियतकालिके, कारखानदारी इत्यादींच्या अनुसंधानाने राज्यकर्ते आणि एतद्देशीय लोकांनी व्यक्तिगत व सामुदायीक हलचाली केल्या. या सर्वांच्या क्रियाप्रतिक्रियातून या नव्या मूल्यांचे येथे कमीजास्त प्रमाणात संवर्धन होत गेले. जीवनाच्या राजकीय, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अंगांकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण येथील लोकांना प्राप्त झाला. किंबहुना राजकीय स्थित्यंतरासोबत एक प्रचंड मानसिक परिवर्तन येथे घडून आले.

पाश्चात्य शिक्षणाने एतद्देशीय लोकांना जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी, तिच्या आविष्काराची नवी साधने, समाजातील साऱ्याच थरांना आत्मविमोचन करुन घेण्याची तात्त्विक संधी इत्यादी गोष्टी प्रथमच उपलब्ध करुन दिल्या. या दृष्टीने इंग्रजी राजवट ही पुरोगामीच होती. भारतीयांच्या मागासलेपणावर जसजसा आघात होऊ लागला तसतशी नव्या जुन्याची ओढाताण फार मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. पाश्चात्य कला, इतिहास, संस्कृति, औद्योगीकरण, त्यांचे पुढारलेपण पाहून एतद्देशीय लोक भारावून गेले. आपल्या देशाचे मागासलेपण ओळखून धर्मांतर, स्त्री-शिक्षण, विधवाविवाह, जातिभेद, लोकशाही, जनतेची दु:खे,राज्यकर्त्यांचे अन्याय, अर्थकारण, सांस्कृतिक घडामोडी इत्यादी विविध व वैचित्र्यपूर्ण बाबीवर प्रांजळ मतप्रकटन होऊ लागले. यातूनच अशिक्षित-सुशिक्षित, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, सनातनी-सुधारक, ख्रिस्ती -ख्रिस्तेतर, राज्यकर्ते - प्रजा इत्यादी अनेक द्वंद्वाचाही जन्म झाला.

हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणाचा परिणाम

इ.स. १८१८ पासून सा-या हिंदुस्थानभर ब्रिटीशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. हिंदुस्थानच्या कोसळत्या राजकीय सत्तेचा आर्थिक पाया ढासळत असल्याने इंग्रज हे कोणी परके आहेत, त्यांचे अस्तान येथे असू नये, त्यांना मदत करणे म्हणजे देशद्रोह आहे असे कुणाला वाटले नाही. उलट इंग्रजांचे राज्य हे कायद्याचे आणि सुयंत्रित असल्यामुळे इंग्रजी सत्तेचे प्रथमतः स्वागतच झाले. संपूर्ण हिंदुस्थानभर आपले सार्वभौमत्व निर्माण झाल्यावर ते अधिकाधिक टिकवून ठेवणे इंग्रजांना अधिक महत्वाचे वाटू लागले. प्रजेची मनोवृत्ती स्वकीय राजसत्तेस अनुकूल करून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी हालचाली सुरू केल्या.

नव्या राजवटीला नवीन त-हेचा नोकरवर्ग निर्माण करणे आवश्यक असल्यामुळे इंग्रजांनी हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणाचा श्रीगणेशा केला. शाळा-कॉलेजची स्थापना केली. विद्यापीठांची निर्मिती केली. इंग्रजी विद्यारूपी वाघिणीचे दूध प्राशन केल्यामुळे एतद्देशीय शिक्षितांच्या मनात आत्मभान आले. `स्व` विघायक ही नवी जाणीव पुढे अनेक सामाजिक आणि वाङ्मयीन प्रवाहांना प्रेरणा देणारी ठरली. हिंदुस्थानी नवशिक्षित युवक पराधीनतेची बंधने झुगारून देण्यासाठी जागृत झाला. इंग्रजी विद्येमुळे जगाशी संबंध येऊ लागला. जगाकडे पाहण्याची ती खिडकीच वाटू लागली. हिंदुस्थानातील धर्म, रीतिरिवाज, भाषा, साहित्य, संस्कृति हे सर्व त्याज्य आहे व इंग्रजांचे सर्वकाही अनुकरणीय आहे, असे या नवशिक्षित तरुण पिढीला वाटू लागले. आपण या जगाच्या दोन तीन शतके मागे आहोत व इंग्रजांच्या सान्निध्याने आपणास हे मागासलेपण काढून टाकण्याची दैवयोगाने सुवर्णसंधीच मिळाली आहे असे-ही त्याना वाटू लागले. इंग्रजी शिक्षणामुळे भौतिक विद्यांची उन्नती

होऊ लागली. हिंदुस्थानातील जुने शिक्षण कालबाह्य होऊन पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र, गणित, इतिहास, भूगोल, वाङ्.मय यांसारखे नवे शिक्षण मिळताच एतद्देशीयांना चोकस व चौरस बुध्दीचे बाळकडू मिळू लागले. चिकित्सेच्या आधारावर नवी दृष्टि त्याला लाभली. इंग्रजी विद्येतच मुळी व्यक्तिवाद जागृत करण्याचे सामर्थ्य असल्यामुळे आणि वाङ्.मयाच्या परिणामामुळे जागतिक जीवनातील घडामोडी नव-शिक्षिताला कळू लागल्या. जागतिक जीवनात झालेली स्थित्यंतरे, विशेषत: फ्रेंच राज्यक्रांतीनंतर जे काही बदल होत गेले त्यामुळे जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलला. त्या सर्वांचा परिणाम नवशिक्षित पिढीवर झाला. इंग्रजांच्या किंबहुना जगातील नव्या राजकीय व सामाजिक चळवळी आपल्याकडेही आणल्याशिवाय आपली राष्ट्रोन्नती अशक्य आहे अशी या सुशिक्षितांची भावना झाली.

इंग्रजी चळवळीचे प्रमुख केंद्र मुंबई

मुंबई हे मराठी भाषिकांचे सर्वांत मोठे व महत्वाचे शहर असून ते व्यापारासाठी अनुकूल असे असल्यामुळे इंग्रजांनी मुंबईला आपल्या चळवळीचे प्रमुख केंद्र बनविले. इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस, यांस त्याच्या लग्नसमयी मुंबई बेट पोर्तुगालच्या राजाने आंदण दिले. तेव्हापासूनच त्यांनी मुंबईला प्रगतीपथाकडे पोहोचविले. टोलेजंग वाडे, विस्तीर्ण इमारती, स्वच्छ व सरळ रस्ते आणि औद्योगिक वसाहत असवून त्यांनी मुंबईला पाश्चात्य शहराचा डामडौल आणला. इंग्रजी राजवट आल्यानंतर या शहराचा आणखीनच विकास झाला. मोठ-मोठ्या बाजारपेठा निर्माण करण्यात आल्या. गोदी व जहाजबांधणीचे काम त्यांनी सुरू केले. व्यापाराबरोबर औद्योगीकरणाचा भरभक्कम पाया घातला. कारखानदारीमुळे साहजिकच मुंबईची वर्दळ वाढली आणि स्थाईक लोकांना काम मिळू लागले. त्यांच्या

राहणीमानात, आचार-विचारात आमूलाग्र स्वरूपाचा बदल घडून आला.

'छप्पन्न भाषा व अठरापगड जाती,' या म्हणीनुसार मुंबईमध्ये अनेक जाती धर्मांचे लोक स्थायिक झाले होते. शिवाय पारशी, मुसलमान, यहुदी, इस्त्रायल, तुर्क, अरब, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज इत्यादी परकीय लोक वस्ती करून राहिले होते. भिन्न जात, भिन्न पोषाख, भिन्न चालीरीती यामुळे मुंबईची संस्कृतीच प्रगत बनली होती. साऱ्या हिंदुस्थानची सूत्रे मुंबईतून हलवायला इंग्रजांनी सुरूवात केली होती. परकीयांची सतत ये-जा, यामुळे संस्कृतीची सरमिसळ होत होती. भाषा, चालीरीती, हिंदुस्थानची प्रमुख बाजारपेठ, शिक्षणसंस्था, कारखानदारी व्यापारी उलाढाली यामुळे मुंबई शहर इंग्रजी संस्कृतीचे प्रमुख केंद्र बनले होते.

## हिंदुस्थानात वृत्तपत्र निर्मितीस अनुकूल वातावरण

प्लासीच्या लढाईने इंग्रजांच्या हाती हिंदुस्थानची सारी सूत्रे आल्यावर व्यापारी कंपनी राज्यकर्ती बनली. पूर्वीच्या वसाहतीतील एकदेशी कारभार संपुष्टात आला. कंपनीला शासकीय व्यवहार करावा लागल्याने त्यांच्याविरूध्द असंतोष निर्माण होऊ लागला व तो प्रकट करण्याची इच्छा प्रबळ होऊ लागली. या इच्छेतूनच हिंदुस्थानात वृत्तपत्रांचा जन्म झाला. अशातच इंग्रजांची हिंदुस्थानात येण्याची संख्याही वाढू लागली. संपत्तीच्या लोभाने व व्यापाराव्यतिरिक्त अन्य उद्देशानेही काही पाश्चात्य लोक येऊ लागले. त्यामुळे वसाहतीमध्ये स्वहित संबंधाने एकसंघपणा नाहीसा होऊन मतभेदाचे बीजारोपण झाले. साहजिकच ते व्यक्त करण्याची गरज भासू लागली. सत्ताधाऱ्यांविरूध्द गाऱ्हाणी असत व ती त्यांच्या कानापर्यंन्त पोहचवणारी वृत्तपत्रासारखी साधने या

परिस्थितीमुळे निर्माण झाली. त्यातच इंग्रजी वृत्तपत्रे इंग्लंडमधून येत होती आणि ती इंग्रजांच्या वाचनात येत होती. इंग्लंडच्या राजकीय घडामोडीमध्ये वृत्तपत्राने मोलाची कामगिरी केली होती. राज्यकर्त्यांचे दोष आणि जनतेचे कल्याण याकडे वृत्तपत्रांनी लक्ष दिल्याने एक प्रभावी शक्ती म्हणून इंग्लंडात वृत्तपत्रांना स्थान मिळू लागले होते. इंग्लंडमधील या घडामोडीचे पडसाद येथे थोडेफार उमटणे अपरिहार्य होते. त्यातूनच आपले मत प्रकट करण्यासाठी वृत्तपत्रासारख्या साधनांचा वापर करणे उपयुक्त ठरेल ही जाणीव येथे रुजली.

## वृत्तपत्र हे प्रबोधनाचे प्रभावी माध्यम

पाश्चात्यांच्या संपर्काने आधुनिक विद्येशी संपर्क येऊन हिंदुस्थानी लोकांच्यामध्ये जागृती झाली व विविध क्षेत्रातील उणीवा दूर करण्याचा प्रयत्न सुरू झाला. पाश्चात्यांच्या वृत्तपत्र सृष्टीच्या निमित्ताने वृत्तपत्रा-विषयीच्या एतद्देशीय लोकांच्याही मनात अनेकविध कल्पना जागृत झाल्या. स्वमतप्रकटन, ज्ञानदान, विचारस्वातंत्र्य, अन्यायाला वाचा फोडणे, महत्वाच्या सामाजिक जबाबदाऱ्याची उकल करून जनतेचे प्रबोधन करता येते हे वृत्तपत्राचे महत्वाचे सामर्थ्य प्रकट करू लागले. ` नियतकालिकांच्या प्रचाराला मुद्रणसंस्थेचे फार मोठे सहाय्य लाभले. मुद्रणसंस्था व वृत्तपत्र-संस्था या दोन संस्थांचे ज्ञानप्रसारदृष्ट्या, शिक्षणसंस्थापेक्षाही अधिक महत्व आहे. कारण शिक्षणसंस्थेप्रमाणे याची कक्षा मर्यादित. छपाईची कला ही विज्ञानाने आधुनिक संस्कृतीला दिलेली फार मोठी देणगी आहे.` असे रा.श्री.जोग म्हणतात. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी ` अनेक विद्यामूलतत्व संग्रह` या पुस्तकामध्ये तर -` छापण्याची युक्ती न निघती तर वर्तमानपत्रे व नियमित काळी निघणारी पुस्तके वगैरे कधी न होती....

हल्ली पृथ्वीवर एका महिन्यात जितके कागद छापले जातात, तितके हाताने लिहावयाचे असते, तर कोट्यावधी मनुष्ये लागली असती. संपत्ती इत्यादी उत्तमोत्तम गोष्टी उत्तरोत्तर वाढत(जाव्या म्हणून) परमेश्वरानेही अप्रतिम व अत्युत्तम कला ह्या लोकी पाठविली.'(१) असे विचार प्रकट केले आहेत. ठराविक वेळी आणि इष्ट,त्या संख्येने एकच मजकूर वाचकांना सादर करता येणे हे नियतकालिकाचे काम मुद्रणकलेमुळे सुकर तर झालेच परंतु नियतकालिकांना फार मोठे वरदान लाभले.

इंग्रजी राजवटीबरोबर आणि त्या राजवटीमध्ये सुरू झालेल्या शिक्षणामुळे आपल्या ऐहिक आणि वर्तमानकालीन जीवनाविषयीच्या दृष्टिकोनामध्ये फरक होऊन त्याविषयी आपल्यास अधिक आस्था वाटू लागली. हिंदी लोकांचा वाचनापेक्षाही अधिक घनिष्ट संबंध इंग्रजी वृत्त-पत्राशी येऊ लागला. त्याचे महत्व पटून त्याविषयी आस्थाही वाटू लागली. इंग्रजाशी घनिष्ठ संबंध बंगालमध्ये आल्याने विचार मंथनाला आणि सामाजिक जागृतीला प्रथमत:च तेथेच प्रारंभ झाला. त्यातून राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये सर्वांगीण विकासाचा उद्योग आरंभिला होता. अशा उद्योगासाठी प्रबोधनाची नवी साधने आणि माध्यमे उपयोगात आणण्याचा साहजिकच प्रयत्न झाला, वृत्तपत्र हे लोकसंवादाचे आणि प्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे हे पटू लागले. इंग्रजांनी चालविलेल्या वृत्तपत्राचा तयार नमुना समोर होताच. त्या वृत्तपत्रांचे स्वरूप एतद्देशीय लोकांना उपयुक्त ठरणारे नव्हते, म्हणून आपली स्वत:ची वृत्तपत्रे सुरू करावीत असे इथल्या लोकांना वाटू लागले. रा.के. लेले म्हणतात, 'सुरुवातीची सारी वृत्तपत्रे इंग्रजी होती, व त्यांचे स्वरूप आंग्ल समाजा-साठी चालविलेली वृत्तपत्रे असे होते ..... हिंदुस्थानात चालविण्यात येत होती म्हणून त्यांना भारतीय म्हणावयाचे, अन्यथा ती इंग्लंडातील

वृत्तपत्रांची कमी दर्जाची नक्कल होती. हिंदी जनतेबाबत, येथील घडामोडी-बाबत त्यात विशेष काही वाढत नसे. यामुळे हिंदी जनतेच्या आकांक्षांचे प्रतिबिंब त्यात पडण्याचा प्रश्नच नव्हता.असे असले तरी भारतीय वृत्तपत्रसृष्टीचा पाया त्यांच्याद्वारा घातला गेला. शिवाय, या वृत्तपत्रांनी हिंदी वृत्तपत्रांसाठी एक तयार नमुना उपलब्ध करून दिला. वृत्तपत्र चालविताना वृत्त देण्याबरोबरच टीका टिप्पणी करून प्रबोधन करून लोकमत बनविले नाही, तरी त्याला वळण देण्याचा दृष्टिकोण ठेवणे आवश्यक असते. परिणामांची तमा न बाळगता शासनावर निर्भीडपणे शस्त्र धरण्याची तयारी संपादकाला ठेवावी लागते. शासनाचा रोष पत्करूनही जनहिताच्या दृष्टीने ठामपणे मतप्रतिपादन करण्याचा बेडरपणा दाखवावा लागतो. हे सारे गुण सुरवातीच्या या इंग्रजी वृत्तपत्रांनी कमीअधिक प्रमाणात का-र प्रकट केले, आणि वृत्तपत्र चालविण्याचा एक वस्तुपाठ येथे घालून दिला. ही वृत्तपत्रे ब्रिटिश वृत्तपत्रांच्या नमुन्यावर बेतलेली असल्याने व ब्रिटिश उदारमताचा वारसा आणि नव्याने उदयास येत असलेल्या आधुनिक लोकशाहीचे बाळकडू ही वृत्तपत्रे चालविणाऱ्या काहींना तरी लाभलेले असल्याने, हिंदुस्थानातल्या पहिल्या इंग्रजी वृत्तपत्रांनी एक चांगला आदर्श लोकांपुढे ठेवला." (२)

### नियतकालिक : एक समर्थ माध्यम

बातमी देणे व टीकाटिप्पणी करणे हे वर्तमानपत्राचे प्रमुख कार्य. आवश्यक ती माहिती मिळविण्याची वृत्ती माणसाच्या ठिकाणी असतेच, शिवाय कुतूहल व सुरक्षितता या माणसाच्या सहज प्रवृत्ती आहेत. आजूबाजूच्या माणसांविषयी माहिती मिळविण्याची वृत्ती माणसात रानटी अवस्थेपासून आहे. प्राचीनकाळी बातम्या तोंडी, शब्दांनी, खाजगी व

सरकारी पत्रव्यवहाराद्वारे, सार्वजनिक ठिकाणी पत्रके लाऊन वा दवंडी पिटवून किंवा दगडी स्तंभाचा उपयोग करून लोकापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न केला जात असे. एखादी नवीन, अघटित वा सर्वांना जिच्याविषयी आस्था असेल अशा घटनेची माहिती प्रथम जाहीर करणे म्हणजे `वार्ता` अशी जिची व्याख्या केली जाते तिचे अस्तित्व व तिचा प्रसार करण्याची साधने समाजाच्या अगदी प्राथमिक अवस्थेतही आढळतात. पण त्यांना काही मर्यादा होत्या. एकाचवेळी वार्ता सर्वांपर्यंत पोचवणे अवघड होते. वृत्ताच्या अनेक हस्तलिखित प्रती तयार करणे सुलभ नव्हते. मुद्रणकलेच्या शोधामुळे या अडचणीतून मार्ग निघाला. यामुळेच वृत्तपत्राचा जन्म सुकर झाला. वृत्ताचा दूरवर प्रसार झटपट करणे शक्य झाले. हिंदुस्थानातही आधी मुद्रणकला आली आणि नंतर वृत्तपत्रे निघाली. इतर अनेक आधुनिक कलाप्रमाणे मुद्रणाची कलाही पाश्चात्यांमुळे हिंदुस्थानात आली. पाश्चात्यांमुळेच वृत्तपत्रव्यवसाय हिंदुस्थानात दृढ झाला. अर्थात पाश्चात्य लोक आले नसते तर वृत्तपत्र व्यवसाय हिंदुस्थानात सुरू झाला नसता असेही म्हणता येत नाही. तर त्यांच्यामुळे तो हिंदुस्थानात लौकर आला असे म्हटले तर ते सयुक्तिक ठरेल. वृत्तपत्रनिर्मितीला आवश्यक असे सार्वजनिक जीवन असावे लागते. शिवाय मुद्रणाच्या सोयी, दळणवळणाच्या सोयी आणि पुरेसा वाचक वर्ग असावा लागतो. हिंदुस्थानात या सर्व गोष्टींची पूर्तता इंग्रजी राजवटीत झाली. त्यामुळे हिंदुस्थानातील वृत्तपत्रनिर्मितीला गती मिळाली.

## हिंदुस्थानातील पहिले वृत्तपत्र

हिंदुस्थानात वृत्तपत्र निर्मितीच्या कामी कंपनीच्या नोकरांनी पुढाकार घेतला. त्यातही पहिला अयशस्वी प्रयत्न `विल्यम बोल्टस्`

नावाच्या इस्म गृहस्थाने केला. बातमीचा प्रसार करून वृत्तपत्राचे मुख्य कार्य मतप्रदर्शन ही त्याची कल्पना होती, पण कंपनीच्या अधिका-यांच्या आडकाठी धोरणामुळे विल्यम् असफल झाला. २९ जानेवारी १७८० रोजी जेम्स ऑगस्टस् हिकी याने हिंदुस्थानातील पहिले वृत्तपत्र `बेंगॉल गॅझेट` ( Bengal Gazette ) किंवा `कलकत्ता जनरल ॲड्व्हर्टायझर` ( Calcutta General Advertiser ) या नावाने सुरू केले. `हिकीज गॅझेट` नावानेच ते प्रसिध्द आहे. धंद्याने मुद्रक असलेला व विद्वत्ता आणि सुसंस्कृतपणाचा अभाव असलेल्या हिकीने केवळ हौसेखातरच हे इंग्रजी साप्ताहिक सुरू केले होते. त्यामुळे त्या पत्रातील लेखन अभिरुचीहीन, हिणकस दर्जाचे होते. लोकांच्या खाजगी जीवनावर शिंतोडे, सरकारी अधिका-यावर अमर्याद टीका, निंदानालस्ती व वसाहतीतील शांतता धोक्यात आणणारा मजकूर प्रसिध्द होत असल्याने सरकारने त्यावर बंदी घातली. काहीनी त्याच्यावर अब्रुनुकसानीचे खटले घातले. परिणामी त्याला चार महिने कैदेची व ५०० रूपये दंडाची शिक्षा झाली. एवढेच नव्हे, तर त्याला जप्तीसारख्या संकटांना सामोरे जावे लागले. शेवटी त्याची अन्नान दशा झाली. पहिल्याच वर्तमानपत्राच्या संपादकाची अशी शोकांतिका झाली. परंतु सरकारी रोषाला उत्तर देताना तो म्हणतो - `समाजात मुद्रणस्वातंत्र्य असणे आवश्यक असून प्रजाजनांना आपला विचार व मत मांडण्यास मोकळीक असली पाहिजे. या स्वातंत्र्यावर घाला घालणारे कोणतेही वृत्त जुलमी व घातक ठरेल." (३) अर्थात हिकीला हवे असलेले स्वातंत्र्य इंग्लिश लोकापुरतेच मर्यादित होते.

## हिंदुस्थानातील इंग्रजी वृत्तपत्रांचे स्वरूप

हिकीने पहिले वृत्तपत्र सुरू केल्यावर त्याचे अनुकरण कलकत्त्यात तर झालेच, पण इंग्रजांच्या ताब्यातील मद्रास, मुंबई या मुलखातही वृत्तपत्रांचा

उदय झाला. परंतु त्याचे स्वरूप व त्यांचा वाचकवर्ग हा त्या इंग्रज समाजापुरताच मर्यादित होता. यामुळे त्यांचा खप १००-२०० च्या घरातच असे. पण चालकांच्या डोळ्यासमोर इंग्रज वाचकवर्ग व तोही मूठभर असा असल्याने त्यातील मजकूर त्या जनतेला आवडेल रूचेल असाच असे. त्यामुळे सात आठ महिन्यापूर्वीची शिळी वर्ताही उत्सुकतेने वाचली जाई. परदेशची बातमीपत्रे, जाहिरनामे, वाचकांची पत्रे, व क्वचित काव्यही प्रसिध्द करण्यात येई. जहाजांच्या बातम्या बरोबरच प्रचलित व नव्या फॅशनची माहिती या स्त्रियांच्या आवडीच्या विषयाला वृत्तपत्रात स्थान देण्यात येई. क्वचितप्रसंगी जाहिरातीनाही त्यामध्ये स्थान असे. ज्या देशात हे इंग्रज लोक रहात होते, व्यापार-उद्योग करीत होते, राजसत्ताही चालवू लागले होते त्या हिंदुस्थान देशातील जनतेचे अस्तित्वच जणू नाही असे या सुरूवातीच्या वृत्तपत्राचे स्वरूप होते. येथील घडामोडींना, जनतेच्या सुख:दुःखाना पत्रात बिलकुल स्थान नसे. त्या सुमारास इंग्रजी भाषेचा प्रसार न झाल्याने एतद्देशियांची वाचण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे हिंदुस्थानी जनजीवनाविषयी वृत्तपत्रामध्ये बिलकुल आस्था नव्हती.

कंपनी सरकारच्या या वरिष्ठ अधिका-यांना वृत्तपत्राबद्दल मोठी आस्था वाटत होती असे नाही. जरा अधिक टीका झाल्यास संपादकास समज दिली जाई. फार तर जहाजात बसवून मायदेशी पाठवण्यात येई. वृत्तपत्रातील वैगुण्ये, त्रुटी व अन्याय यांची दखल मात्र घेतली जाई. सरकारचे वृत्तपत्राबाबत निश्चित असे धोरण नसल्यामुळे बहुतेक संपादकांना सरकार-पुढे गुळमस्क-याची भूमिका स्वीकारावी लागे.

मुंबईतील पहिले वृत्तपत्र

मुंबईमध्ये वृत्तपत्रास अनुकूल असे सार्वजनिक जीवन नसल्यामुळे वृत्तपत्राची

सुरूवात झाली ती कलकत्ता आणि मद्रासनंतरच. मुंबईतील पहिले वृत्तपत्र `बॉंबे हेरॉल्ड` १७८९ साली निघाले असले तरी त्याची फारशी माहिती उपलब्ध नाही. त्यानंतर १७९० मध्ये ल्यूक ॲशबर्नर याने `बॉंबे कुरियर` हे वृत्तपत्र सुरू केले. या पत्राचे वैशिष्टय असे होते की या इंग्रजी पत्रात प्रथमच गुजराथी व मराठी जाहिराती प्रसिध्द होत असत. त्यानंतर १७९१ साली `बॉंबे गॅझेट` हे साप्ताहिक सुरू झाले. या पत्रात सरकारी अधिसूचना, आज्ञा, ठराव इत्यादी अधिकृत म्हणून प्रसिध्द करण्यास मुंबई सरकारने मान्यता दिली होती. हे पत्र जवळ जवळ सव्वाशे वर्षे चालू होते.

## हिंदुस्थानी जीवनातील वृत्तपत्रे

इ.स.१८१६ साली गंगाधर भट्टाचार्य या हिंदुस्थानी गृहस्थाने `बेंगॉल गॅझेट` नावाचे पहिलेच हिंदुस्थानी परंतु इंग्रजी भाषेमधून वृत्तपत्र काढले. फक्त वर्षभरच ते चालले असले तरी हिंदी लोकांचे पहिले पत्र व पहिला प्रयत्न हे त्याचे महत्व कधीच दृष्टिआड करून चालणार नाही. यानंतर हिंदुस्थानी भाषेत वृत्तपत्र काढण्याचा पहिला प्रयत्न श्रीरामपूरच्या बॅप्टिस्ट मिशनऱ्यांनी केला. धर्मप्रसाराचे एक महत्वाचे साधन म्हणून हिंदुस्थानातील विविध भाषांत बायबल छापण्याचा त्यांनी अगोदरच प्रयत्न केला होता; त्यामुळे बंगाली भाषेत वृत्तपत्र काढण्याचे धाडस त्यांनी केले. धर्मप्रसारासाठी देशी भाषांविषयी आस्था निर्माण करण्याच्या हेतूने त्यांनी एप्रिल १८१८ मध्ये `दिग्दर्शन` हे बंगाली भाषेतील मासिक सुरू केले. सरकारची प्रतिक्रिया अजमाविण्याच्या हेतूने त्यांनी प्रथम मासिक काढले. व पुढे २३ मे १८१८ रोजी `समाचार दर्पण` हे बंगाली भाषेतील साप्ताहिक सुरू केले.

हिंदुस्थानी भाषांत वृत्तपत्रे निघू लागली हे नवा जमाना येऊ लागल्याचे सुचिन्ह होते. लोकजागृती सुरू होऊन त्यासाठी नवी साधने निर्माण करण्याची प्रवृत्ती मूळ धरू लागल्याचे ते द्योतक होते. हिंदुस्थानातील वृत्तपत्राचे जग हे ब्रिटिश वा फ्रेंच वृत्तपत्राप्रमाणे एकभाषी नाही. येथे अनेक भाषा चालतात व अनेक भाषा समृध्द आहेत. त्यामुळे हिंदुस्थानी वृत्तपत्रे म्हणजे विविध भाषांतील वृत्तपत्रे होत. महत्वाच्या हिंदुस्थानी भाषांत वृत्तपत्रे साधारणपणे एकाचवेळी निघू लागली. बंगालीबरोबर फारशी, उर्दू, हिंदी, तामिळी, उडीया, आसामी, पंजाबी इ. भाषांतील वर्तमानपत्रे सुरू झाली.

मुंबईमध्ये पारशी लोकांच्या पुढाकारामुळेच गुजराती वृत्तपत्रे सुरू झाली. इंग्रजी वृत्तपत्रानंतर चाळीस वर्षांनी हिंदुस्थानी भाषेत फर्दुनजी मर्झबान, या पारशी गृहस्थाने १८२२ साली `मुंबईना समाचार` हे साप्ताहिक सुरू केले. वृत्तपत्र निर्मितीस अनुकूल वातावरण असल्यामुळे आणि शिक्षणात मुंबईकर आघाडीवर असलेल्या पारशी लोकांनी अनेक वृत्तपत्रांना जन्म दिला. `मुंबई वर्तमान,` मुंबईना हरकारू अने वर्तमान : `मुंबईना चाबुक,` जामे जमशेद,` मुंबई दुर्बीण,` `समाचार दर्पण` `रास्त गोफतार` इ. गुजराती वृत्तपत्रांचा व्याप बराच काळ मुंबईत राहिला व वृत्तपत्रांच्या कामी त्यांनी खूपच आघाडी मारली.

## मराठी वृत्तपत्राच्या प्रेरणा

मराठी भाषिकांचे मुंबई हे मोठे शहर असून मुंबईत गुजराती वृत्तपत्र निघाल्यावर मराठी वृत्तपत्र निघाले. मराठी वृत्तपत्र मुंबईखेरीज अन्य कोणत्याही ठिकाणी अगदी पुण्यातही निघणे त्यावेळी अशक्य होते. मुंबईमध्ये वर्तमान पत्रास आवश्यक ते सार्वजनिक वातावरण व

आधुनिकता असल्यामुळे नवे विचार समजून घेण्याइतकी मानसिक क्षमता मुंबईतील मराठी लोकात निर्माण झाली होती. विद्यासंपादनामुळे लेखन-वाचन करणारे मराठी लोक तयार झाले. ग्रंथनिर्मितीप्रमाणेच वृत्तपत्र हेही ज्ञानप्रसाराचे एक अमोघ साधन आहे याची जाणीव निर्माण झाली. इंग्रजी वृत्तपत्रांचा किता समोर होताच. गुजराती वृत्तपत्रे डोळ्यासमोर होती. क्वचित ती वाचण्यातही येत असत. तसेच बंगाली वृत्तपत्रांची माहितीही कानी पडत होती. यामुळे मराठी भाषिक लोक हळूहळू वृत्तपत्राकडे वळणे अपरिहार्य ठरले. ज्ञानाचा प्रसार करण्यास प्रथम त्याचा संचय व्हावा लागतो. ज्ञान दुसऱ्यास देण्यास आत्मविश्वास वाढीस लागावा लागतो. त्याची संपन्नता अनुभवास येण्यास काही कालावधी लागतो. संपन्नतेनंतर ज्ञानदानाच्या प्रेरणेला अवकाश लागतो. मराठी वृत्तपत्र अशाच प्रेरणेतून जन्मास आले. प्रबोधनाची, नव्या पाश्चात्य विद्येचा देशबांधवाना परिचय करून देण्याची प्रेरणा त्यामागे होती.

## मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र

मराठी भाषेतील पहिल्या वृत्तपत्राचा मान आचार्य बाळशास्त्री जांभेकरांच्या `दर्पण` या वृत्तपत्राला दिला जातो. तथापि `दर्पण` च्या अगोदर एक मराठी वृत्तपत्र अस्तित्वात असल्याचा पुरावा मात्र मिळतो. २० जुलै १८२८ रोजी त्याचा `मुंबापूर वर्तमान` चा पहिला अंक प्रसिध्द झाला होता. परंतु त्या पत्राचा चालक कोण होता, संपादक कोण, प्रकाशक कोण, व ते कितीवेळ चालले होते याचा पत्ता लागत नाही. पत्राच्या पहिल्या अंकात प्रसिध्द झालेला `एक विक्षिप्त` यांचा लेख `बॉंबे गॅझेट` या मुंबईतील इंग्रजी वृत्तपत्राने आपल्या २३ जुलै १८२८ च्या अंकात प्रसिध्द केला होता, हाच काय तो पुरावा. तत्कालीन वृत्तपत्रे

चालूनही त्याची माहिती मिळत नाही. तसेच ते साप्ताहिक, पाक्षिक की मासिक होते हेही स्पष्ट होत नाही. परंतु `मुंबापूर वर्तमान` पत्राला आद्य मराठी वृत्तपत्र असे निश्चितपणे म्हणावे, असा पुरेसा आधार मिळत नाही. कालानुक्रमे `दर्पण` हे पहिले मराठी वृत्तपत्र म्हणता आले नाही तरी मराठी वृत्तपत्राचा पाया घालून त्याची थोर परंपरा सुरू करण्याचा मान `दर्पण` कडेच जातो. `दर्पण` चे संपादक बाळशास्त्री जांभेकर ह्यांचे स्वतंत्र कर्तृत्वही थोर असल्याने त्या पत्राला वयाने नाही तरी गुणकर्तृत्वाने श्रेष्ठत्वाचा मान देणे जरूर आहे. ज्या पत्राचे आणि त्या संपादकाचे स्मरण नंतरही सतत कायम राहिले त्या पत्राला आद्य पत्र म्हणून गौरविता आले नाही तरी प्रथम दर्जाचे आद्यपत्र म्हणून त्याचा उल्लेख केलाच पाहिजे. सामाजिक जीवनाला प्रेरणा देण्याचा ज्या वृत्तपत्राने प्रयत्न केला ते वृत्तपत्र म्हणजे `दर्पण` होय. त्याचा विचार पुढे आपण करणार आहोत.

...

## प्रकरण पहिले

### संदर्भ टीपा


१. कृष्णाशास्त्री चिपळूणकर, अनेकविद्या मूलतत्व संग्रह, मुंबई, १८६१, पृ.१९२.

२. रा.के.लेले, मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८४, पृ.३८, ३९.

३. तत्रैव पृ.२५, २६.


...